## प्रेस नोट

### कळंब शहरात घरफोडी करणारी 'मोगलीस गॅंग' जेरबंद.

पो.स्टे. कळंब हद्दीत कळंब शहरात दिवसा होणा-या घरफोडीचे सत्राचे आव्हान लक्षात घेता गुन्हयातील अज्ञात आरोपीचा व चोरीस गेलेला मुद्देमालाचा शोध घेणेकामी मा. पोलीस अधिक्षक साहेब, यवतमाळ यांनी दिलेल्या आदेशा प्रमाणे उपविभागीय पोलीस अधिकारी यवतमाळ व पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन कळंब यांनी पथक तयार केले होते.

कळंब शहरात होणा-या घरफोडीचे आरोपी शोधण्यासाठी शहरातील सिसिटीव्ही फुटेज तसेच गोपनिय मुखबीर यांची मदत घेवुन व तांत्रीक पुराव्याच्या आधारे तपासावर भर देवुन यवतमाळ शहर येथील मोगलीस गॅंग मधिल आरोपी नामे प्रथमेश अनिल दोनाडकर वय १९ वर्ष रा. तलाव फैल यवतमाळ यास सखोल विचारपुस केली असता त्यांनी त्याच्या दोन वि.सं.बा. साथीदारासह कळंब शहरात ३ घरफोडया केल्याचे कबुल केले. त्यावरून कळंब शहरात दिवसा घरफोडी करणा-या **'मोगलीस गॅंग'** यांना ताब्यात घेवुन पो.स्टे. कळंब अपराध क्र. १) ७१२/२०२४ कलम ३३१(३), ३०५(अ) भारतीय न्याय सहींता, २) ०७/२०२५ कलम ३३१(३), ३०५(अ) भारतीय न्याय सहींता ३) १६/२०२५ कलम ३३१(३), ३०५(अ) भारतीय न्याय सहींता, गुन्हयातील चोरीस गेलेला दागीने, मोबाईल व मोटर सायकल असा एकुण ३,६५,०००/- रूपयाचा मुद्देमाल 'मोगलीस गॅंग' कडुन जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक यवतमाळ श्री. कुमार चिंता, मा. अप्पर पोलीस अधिक्षक श्री. पियुष जगताप मा. उपविभागीय पोलीस अधिकारी यवतमाळ श्री. दिनेश बैसाणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. राजेश राठोड पो.स्टे. कळंब, पोउपनि सागर भारस्कर, पोहवा. अंन्सार बेग, पोशी/विकास कमनर, पोशी/प्रविण उईके नेमणुक उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय यवतमाळ व पोशी/योगेश डोंगरे, पोशी/ गिरीश मडावी पो.स्टे. कळंब, यांनी केली आहे.

पोलीस निरीक्षक
पो.स्टे.कळंब जि.यवतमाळ

